ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणेबाबत.(श्री.मेघश्याम भिमाजी गायकवाड सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत बेलापूर बु. पचायत समिती श्रीरामपूर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग

आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र.११८४०७८

दिनांक.- २८/०४/२०२५

संदर्भ :- १ .या कार्यालयाकडील सेवा निलंबन आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/२३९/२०२४,दि. ०३/०६/२०२४

२. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/२४१/२०२४दि. ०३/०६/२०२४

३. गट विकास अधिकारी श्रीरामपूर यांचे कडील सुधारीत दोषारोप पत्र आस्था २/१५७/२०२५ दिनांक ०७ मार्च २०२५

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (१)

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (५)

६. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. निप्रआ-१११९/प्र.क्र.८६/११-अ, दिनांक- १४/१०/२०११

७. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र. विप्रआ-१११२/प्र.क्र.८२/११-अ, दि.२० एप्रिल २०१३

८. प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. निप्रआ११८/प्र.क्र.११/११अ, दिनांक- ०९/०७/२०१९

संदर्भ क्रमांक ०१ चे आदेशान्वये श्री.मेघश्याम भिमाजी गायकवाड ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत बेलापूर बु.तालुका श्रीरामपूर पंचायत समिती श्रीरामपूर यांना कार्यालयीन कामकाजात संशयीत अपहार व कर्तव्यात कसुर करण्याचे गैरवर्तन केल्याने जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले आहे.

संदर्भ क्र.०२ चे ज्ञापनान्वये श्री.मेघश्याम भिमाजी गायकवाड ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत ग्रामपंचायत बेलापूर बु.ता.श्रीरामपूर पंचायत समिती श्रीरामपूर यांचे गैरवर्तना बाबत एकूण ०४ आरोप ठेवून शिस्तभंगाची कार्यवाही करणे कामी दोषारोप बजावण्यात आलेले आहेत.

संदर्भ क्रमांक ०८ चे शासन निर्णयानुसार श्री.मेघश्याम भिमाजी गायकवाड , सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा सेवा निलंबन कालावधी तीन महिन्यापेक्षा अधिक झालेला असल्याने,तसेच त्यांची विभागीय चौकशी सुरु करणे बाबतचा निर्णय अदयाप घेणे बाकी आहे. त्यांचे सेवानिंलबन प्रकरणाचा आढावा घेण्यात आलेला असुन या निलंबन प्रकरणी श्री. मेघश्याम भिमाजी गायकवाड यांचे सेवानिलंबन या पुढे चालू न ठेवण्याचा व जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

सबब महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री.मेघश्याम भिमाजी गायकवाड ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत ग्रामपंचायत बेलापूर बु.ता.श्रीरामपूर यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती श्रीगोंदा ----- येथे पुन:स्थापित करीत आहे.

श्री.मेघश्याम भिमाजी गायकवाड सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती श्रीरामपूर यांचा या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय, पुढील सुरु असलेली शिस्तभंगविषयक कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

या आदेशाची नोंद श्री.मेघश्याम भिमाजी गायकवाड सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी समिती श्रीरामपूर यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०४२८०६००५३ असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 28-04-2025 10:58:35

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री.मेघश्याम भिमाजी गायकवाड सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी पंचायत समिती श्रीरामपूर
मुख्यालय पंचायत समिती जामखेड
व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड
२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबतची पोहच कार्यालयास अहवाल सादर करावी

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा
२/- श्री.मेघश्याम भिमाजी गायकवाड से.नि. ग्रामपंचायत अधिकारी हे हजर झालेनंतर अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.